स्थायी समितीच्या सोमवार दिनांक 02–01–2012 रोजी दुपारी 03–30 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. संदिप दिवाकर जोशी | अध्यक्ष |
| 2. | श्री. विकास उर्फ बाबा माधवराव मैंद | सदस्य |
| 3. | श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |
| 4. | सौ. उषा गोपाल बोहरे | सदस्या |
| 5. | श्री. भारतभूषण ऋषीपंत गायधणे | सदस्य |
| 6. | श्री. बंडू उर्फ सुधिर हरिदास राऊत | सदस्य |
| 7. | श्री. प्रविण आत्माराम सांदेकर | सदस्य |
| 8. | श्री. अरुण वसंतराव डवरे | सदस्य |
| 9. | श्री. झुल्फेकार अहमद शेख अहमद भूट्टो | सदस्य |
| 10. | सौ. सिंधु रामाजी उईके | सदस्या |
| 11. | सौ. कल्पना सुरेश डवरे | सदस्या |
| 12. | श्री. मोहम्मद कामील अंसारी मो. हसन | सदस्य |
| 13. | डॉ. मिलींद माने | सदस्य |
| 14. | श्री. राहुल सुखदेव तेलंग | सदस्य |

अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | सौ. मंदाताई उर्फ आक्का गंगाधर लेंडे | सदस्या |
| 2. | श्री. अरविंदरपाल सिंग उर्फ बब्बी बावा | सदस्य |

उपस्थित अधिकारी

1) श्री. संजय निपाणे, अति. उप निगम आयुक्त

2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 251 :– वार्ड नं. 120 छत्रपतीनगर बसस्टॉप जवळील खसरा क्र. 2, 3, 37/1–सी, मौजा सोमलवाडा येथील रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता निविदा मागविण्यात आल्या असता प्राप्त निविदेमध्ये मे. आर.एम. गोपलानी यांची प्राकलनिय दरापेक्षा 5.1 टक्के कमी दराची रु. 38,12,195/– ची निम्नत्तम निविदा प्राप्त आहे. या निविदेस मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 252 :– वार्ड नं. 87 मध्ये माटे चौक ते श्रध्दानंदपेठ चौक ते लक्ष्मीनगर चौक ते दिक्षाभूमी चौकापर्यंत रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करण्याच्या कामाकरिता निविदा मागविण्यात आल्या असता प्राप्त निविदेमध्ये मे. पी.एम. ए. कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनिय दरापेक्षा 4.96 टक्के कमी दराची रु. 40,92,715/– ची निम्नत्तम निविदा प्राप्त आहे. या निविदेस मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली. सन 2011–12 मध्ये या कामाचा खर्च रु. 30,00,000/– पर्यंन्तच करण्यात येईल.

ठराव क्रमांक 253 :– वार्ड नं. 87 मध्ये आर.पी.टी.एस. रोड ते काचीपूरा चौक (निरी रोड) पर्यन्त रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करण्याच्या कामाकरिता निविदा मागविण्यात आल्या असता प्राप्त निविदेमध्ये मे. पी.एम. ए. कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनिय दरापेक्षा 4.96 टक्के कमी दराची रु. 47,44,365/– ची निम्नत्तम निविदा प्राप्त आहे. या निविदेस मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली. सन 2011–12 मध्ये या कामाचा खर्च रु. 47,00,000/– पर्यंन्तच करण्यात येईल.

ठराव क्रमांक 254 :– चिल्ड्रेन ट्रॉफिक पार्क परिसर, धरमपेठ येथे सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम करण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रु. 15,54,497/– (पंदरा लक्ष चौपन हजार चारशे सत्यान्नव) च्या प्राकलनास मान्यता प्रदान करुन महाराष्ट्र शासन निर्णय क्र. मु.सा.शौ.–1000/ सं.क्र. –241/प्र.क्र. 13/पा.पु.–21, मंत्रालय, मुंबई – 32, दि. 30 ऑगस्ट 2001 अन्वये सदर्हु काम सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हिस आर्गनायझेशन, मुंबई या सेवाभावी संस्थेकडुन शासन निर्णय क्र. ग.व.सु./1088/सी.आर. 2018, भा.ग.–2/का.–7 मंत्रालय मुंबई–32, दि. 26 ऑगस्ट 1988 नुसार निविदा/आवेदनाची अट शिथिल करुन प्राकलनिय दर अधिक 15 टक्के कार्यान्वयन शुल्कासह आणि करारनाम्या प्रमाणे अग्रीम देऊन त्याचे मार्फत "पैसे द्या व वापरा तत्वावर" दिर्घ मुदतीकरिता सार्वजनिक शौचालये बांधणे, संचालन करणे व देखभाल करणे इत्यादी कामे करण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 255 :– डॉ. आंबेडकर मार्ग राजपूत रेस्टांरेन्ट जवळील चांभार नाल्यावरील पुलावर सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम करण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रु. 19,54,068/– (एकोणविस लक्ष चौपन्न हजार अडुसष्ट) च्या प्राकलनास मान्यता प्रदान करुन महाराष्ट्र शासन निर्णय क्र. मु.सा.शौ.–1000/ सं.क्र. –241/प्र.क्र. 13/पा.पु.–21, मंत्रालय, मुंबई – 32, दि. 30 ऑगस्ट 2001 अन्वये सदर्हु काम सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हिस आर्गनायझेशन, मुंबई या सेवाभावी संस्थेकडुन शासन निर्णय क्र. ग.व.सु./1088/सी.आर. 2018, भा.ग. –2/का.–7 मंत्रालय मुंबई–32, दि. 26 ऑगस्ट 1988 नुसार निविदा/आवेदनाची अट शिथिल करुन प्राकलनिय दर अधिक 15 टक्के कार्यान्वयन शुल्कासह आणि करारनाम्या प्रमाणे अग्रीम देऊन त्याचे मार्फत "पैसे द्या व वापरा तत्वावर" दिर्घ मुदतीकरिता सार्वजनिक शौचालये बांधणे, संचालन करणे व देखभाल करणे इत्यादी कामे करण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 256 :– म.न.पा. जकात भवन संत्रा मार्केट स्थित भवनाचे (नाका क्र. 13) उर्वरित बांधकाम इमारतीचे इंटेरिअर व फर्निचर कामास्तव निविदा राशी रु. 61,51,613/– बोलाविण्यात आल्या. या कामाची प्राप्त निविदा पैकी निम्नत्तम निविदाकार मे. माना कन्स्ट्रक्शन यांची रुपये 54,81,087.18/– या रकमेची प्राकलनिय दरापेक्षा 10.90 टक्के कमी दराची निम्मत्तम निविदा स्विकार करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 257 :– सामाजिक न्याय विभागाच्या 1000 मुलांचे नविन शासकीय वसतीगृहासाठी नागपूर शहरात बंद असलेल्या म.न.पा. शाळा इमारती भाडे तत्वावर उपलब्ध करुन देण्याबाबत सहा. आयुक्त, समाज कल्याण विभाग, नागपूर यांनी विनंती केली आहे.

उपरोक्त कामाकरिता राज्य शासनाला दीक्षाभूमी जवळची शासकीय जमीन उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. परंतू सध्या इमारतीचे बांधकाम सुरु झाले नसल्यामुळे म.न.पा.च्या बंद असलेल्या, गड्डीगोाम येथील प्राथमिक शाळेच्या 19 वर्गखोल्या, लष्करीबाग येथील हिंदी प्राथ. शाळेच्या 8–9 वर्गखोल्या, चंदन नगर येथील बोधीसत्व प्राथ. शाळेच्या 8–9 वर्गखोल्या, अजनी येथील पूर्व समर्थ शाळेच्या 8–9 वर्ग खोल्या भाडे तत्वावर उपलब्ध करुन देण्याबाबत त्यांनी विनंती केली आहे.

उपरोक्त म.न.पा. शाळा विद्यार्थ्यांच्या कमी उपलब्धतेमुळे सद्दस्थितीत बंद आहेत. उपरोक्त बंद शाळा राज्य शासनाला भाडे तत्वावर दयावयाचे असल्यास संबंधीत सहा. आयुक्त म.न.पा. यांचे मार्फत भाडे निश्चित करुन घेण्यात येईल. निश्चित केलेले भाडे व समाज कल्याण विभागातर्फे वस्तीगृह इमारत तयार झाल्यानंतर किंवा म.न.पा.स या शाळांची आवश्यकता भासल्यास या शाळा रिकाम्या करुन देण्यात येतील या सहा. आयुक्त, समाज कल्याण विभाग, नागपूर यांनी दिलेल्या अटीवर हा प्रस्तावास मा. स्थायी समितीची मंजूरी प्राप्त करुन देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 258 :– दिनांक 01.04.2012 पासून डॉ. श्रीकांत जिचकार ट्रॉफीक चिल्ड्रेन पार्कचे प्रवेश शुल्क रु. 2/– व प्ले झोनचे शुल्क रु. 2/– वरुन वाढवून अनुक्रमे रु. 5/– व रु. 3/– करण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 259 :– नागपूर शहराचे मंजूर विकास योजनेनुसार EP-68 रस्ता मौजा सिताबर्डी येथील मॉरीश कॉलेज टि पॉईंट ते इन्स्टीटयुट ऑफ सायन्स कॉलेज पर्यंतच्या 18 मी रुंद रस्त्याची लांबी 680 मी. असुन यामध्ये 24 मीटर लांब पुलाचे बांधकाम, कंपाउंण्ड वॉलचे बांधकाम अंतर्भुत आहे. या रस्त्यांच्या संरेखनानुसार नागपूर विद्यापीठाची, इन्स्टीटयुट ऑफ सायन्स, म्युर मेमोरीअल इत्यादी शासकिय संस्था यांचे कंपाउंण्ड वॉल तोडुन रस्त्याकरीता आवश्यक जागा घेवून नविन ठिकाणी कंपाउंण्ड वॉल बांधण्याच्या खर्च प्राकलनात समाविष्ठ केला असून त्याप्रमाणे वरील शासकीय संस्थना जागेच्या मोबदल्यात IRDP च्या धर्तीवर TDR देण्याचे प्रस्तावित करण्यात येत असुन याबाबतचा करारनामा करण्यात येईल.

याकरिता रुपये 6,03,97,907/– चे ढोबळ प्राकलन तयार करण्यात आलेले असून या कामाकरिता व्यवस्थापकीय सल्लागार (PMC) म्हणून, मेसर्स पी.टी.मसे ॲण्ड असोसिएस्ट्स यांची म.न.पा. च्या मंजूर दरावर नियुक्ती करण्याच्या प्रस्तावासह 6,03,97,907/– चे ढोबळ प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 260 :– आसी नगर झोन अंतर्गत पॉवर ग्रिड कार्यालय ते भारत अपार्टमेंट पर्यंत सिमेंट कॉक्रिट रस्त्यांचे बांधकाम प्रस्तावित आहे. सदर कामाचे प्राकलन रुपये 1,82,08,013/– इतके आहे. सदर काम पॉवर ग्रिड कॉरपोरेशन चे डिपॉझीट वर्क आहे. व पॉवर ग्रिड कॉरपोरेशन ऑफ इंडिया यांचे कार्यालयातर्फे कामास लागणारी रक्कम मिळणार आहे. पहला टप्पा म्हणून रुपये 83,92,238/– प्राप्त झालेले आहेत. सदर कामाची निविदा बोलावण्यात आली असता सर्वात कमी देकार मे.आर.एम. दयारामानी चे 9.90 टक्के अधिक म्हणजे रुपये 2,00,10,606/– आहे. त्यास मंजूरी प्रदान करण्यास प्रस्ताव सादर तसेच सदर कामाचे डिझाईन कंन्सलटंट मे एल.के. जैन व PMC ते C.E.S. ला कार्यान्वीत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 261 :– पुर्व नागपूरातील वाठोडा – ले आऊट प्लॉट नं. अनु.क्र.27/1 ते 40/1 नझुल अनु.क्र. 39/909 येथील म.न.पा.च्या जागेवर क्रिडाठरावक सोयी उभारावयाच्या आहेत.

म.न.पा.च्या आरक्षित जागेवर नागरिकांच्या सोयीच्या दृष्ट्रीने जागेच्या वापरानुसार (D.B.F.O.T.) म्हणजे खाजगी तत्वावर बांधण्याचा प्रस्ताव विचारात घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 262 :– मौजा जरीपटका, मंगळवारी बाजार, सदर, शॉपींग कॉम्प्लेक्स मागील एकूण क्षेत्रफळ 14420.20 चौ.मी. या पैकी एकूण क्षेत्रफळ 6500 चौ.मी. या जागेत अत्याधुनिक बाजार इतर तत्सम् बाजार बांधा, वापरा व हस्तांतरण करा या व इतर तत्सम् पध्दतीचा अवलंब करुन बांधण्याचे प्रस्तावित आहे. त्यास तत्वतः मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 263 :– नागपूर महानगरपालिकेने बाजार विकसित करण्यास्तव अधिग्रहित केलेल्याा मौजा– बाबुळखेडा येथील एकूण क्षेत्रफळ 5772.99 चौ.मीटर जागेवर '' बांधा, वापरा व हस्तांतरित करा '' ( B.O.T.) या तत्वावर बाजार विकसित करण्याचे प्रस्तावित आहे. यास तत्वतः मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 264 :– जलप्रदाय विभागाच्या दहा झोनमध्ये विंधन विहीरी सुस्थिती व दुरुस्तीच्या कामाचा त्रिवार्षिक कंत्राटाची मुदत दि. 24. 12.2011 रोजी संपत असल्याने या कंत्राटासंदर्भात खालील नमूद प्रस्तावास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

1. या कंत्राटास दि. 23.03.2012 पर्यंत मुदतवाढ देण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
2. या कामाकरिता दि. 24.12.2011 ते दि. 23.03.2012 या तिन महिण्यांचा कालावधीकरीता खालीलप्रमाणे नमूद झोननिहाय अतिरिक्त खर्चानुसार एकूण रु. 16,07,800.00 अतिरिक्त खर्चास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

| झोन नांव व क्रमांक | एजेंसीचे नांव | प्रतीमहिना खर्च | तीन महिन्यांकरिता लागणारा खर्च |
|---|---|---|---|
| लक्ष्मीनगर झोन क्र. 1 | मे. शुभमं बोअरवेल ॲन्ड कंस्ट्रक्शन कंपनी. | रु. 41,344.00 | रु. 1,24,031.00 |
| धरमपेठ झोन क्र. 2 | मे. शुभमं बोअरवेल ॲन्ड कंस्ट्रक्शन कंपनी. | रु. 18,428.00 | रु. 55,283.00 |
| हनुमाननगर झोन क्र. 3 | मे. शाह ट्रेडींग कॉर्पोरेशन , नागपूर | रु. 27,523.00 | रु. 82,570.00 |
| धंतोली झोन क्र. 4 | मे. शाह ट्रेडींग कॉर्पोरेशन , नागपूर | रु. 37,918.00 | रु. 1,13,755.00 |
| नेहरुनगर झोन क्र. 5 | मे. शाह ट्रेडींग कॉर्पोरेशन , नागपूर | रु. 61,071.00 | रु. 1,83,212.00 |
| गांधीबाग झोन क्र. 6 | मे. शाह ट्रेडींग कॉर्पोरेशन , नागपूर | रु. 58,944.00 | रु. 1,76,833.00 |
| सतरंजीपुरा झोन क्र. 7 | मे. शाह ट्रेडींग कॉर्पोरेशन , नागपूर | रु. 80,916.00 | रु. 2,42,747.00 |
| लकडगंज झोन क्र. 8 | मे. शाह ट्रेडींग कॉर्पोरेशन , नागपूर | रु. 88,003.00 | रु. 2,64,010.00 |
| आसीनगर झोन क्र. 9 | मे. शुभमं बोअरवेल ॲन्ड कंस्ट्रक्शन कंपनी. | रु. 99,934.00 | रु. 2,99,801.00 |

| | | | |
|---|---|---|---|
| मंगळवारी झोन क्र.10 | मे. शुभमं बोअरवेल ॲन्ड कंस्ट्रक्शन कंपनी. | रु. 21,853.00 | रु. 65,560.00 |
| एकुण | | रु. 5,35,933.00 | रु.16,07,800.00 |

3. या कामावरील अतिरिक्त तिन महिने मुदत वाढीच्या रु. 16,07,800.00 लक्षच्या खर्चासहीत या कंत्राटावरील एकूण रु. 2,09,01,396/– च्या सुधारीत खर्चास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 265 :– हसनबाग कब्रस्थान ते राजेंद्र नगर चौक पर्यंतच्या रस्त्याची सुधारणा व डांबरीकरण करण्याच्या कामास्तव निविदा मागविण्यात आल्या असता मे. एस.के.गुरुबक्षाणी व मे. आर.एम.दयारामानी यांच्या सारख्या दराच्या निविदा प्राकलनीय राशीपेक्षा 3.80 टक्के कमी दरांच्या निविदा निम्मतम आहेत.

करिता रु. 1,11,769,57 /– राशीच्या प्राकलनास कार्योत्तर प्रशासकीय मान्यता प्रदान करुन रु.1,07,768,63 /– राशीची निविदा मंजूर करण्याचा व वरील प्रमाणे दोन्ही निविदाकारास विभागून काम देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 266 :– वार्ड क्र. 15 फेन्डस कॉलोनी मधील काटोल रोड ते फेन्डस कॉलोनी पाईंट ते स्मशानभुमी पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त निम्नतम निविदाकार मे. एस. के. गुरुबक्षानी, यांची प्राकलनीय दरापेक्षा 4.05 टक्के कमी दराची रु. 33,59,196 /– राशीची निविदा मंजूर करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 267 :– नारा रोड ते निर्मल कॉलोनी म.न.पा. पाण्याची टाकी पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करण्याचा कामाकरिता निविदा मागविण्यात आल्या असता मे. आर.एम.दयारामानी, यांची प्राकलनीय दरापेक्षा 21.4 टक्के अधिक दराची व नविन सी.एस.आर. दरापेक्षा 2.17 टक्के कमी दराची निम्नत्तम निविदा रु. 34,90,153 /– ची प्राप्त आहे. या निविदेस मान्यता प्रदान करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 268 :– वार्ड क्र. 15 फेन्डस कॉलोनी मधील सुपर बाजार ते जागृती कॉलोनी ते सुरेन्द्रगढ टी पाईंट पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त निम्नतम निविदाकार मे. ओ.जी.बजाज, यांची प्राकलनीय दरापेक्षा 4.69 टक्के कमी दराची रु. 33,24,058 /– राशीची निविदा मंजूर करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 269 :— स्थायी समिती ठराव क्र. 176 दिनांक 20/12/2011 प्रमाणे दिलेले आदेशाच्या अनुषंगाने, निविदाकाराने निविदा भरतांना त्यांचे नियोजन सादर केलेले होते. ही बाब निदर्शनास आणण्यांत यते. तरी उपरोक्त ठरावास मान्यतेचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

नागपूर शहर ही महाराष्ट्राची उपराजधानी असून ही संत्रा नगरी या नावानी सुप्रसिध्द आहे. तसेच नागपूर शहरातील लोकसंख्यया सध्यास्थितीत जवळ— जवळ 25. 00 लक्ष इतकी आहे. हयामुळे नागपूर शहरातील वाढती वाहतुक व अपघाताचे सुध्दा प्रमाण वाढलेले आहे. नागपूर महानगरपालिके व्दारे पादचाऱ्यांच्या सोयीकरिता नागपूर शहरात खाजगी सहभाग तत्वाव्दारे विविध ठिकाणी ( Foot Over Bridge ) उभारण्याच्या प्रस्ताव सन 2011—12 च्या या वार्षिक अर्थसंकल्पात आखलेला आहे. आखलेल्या योजने अंतर्गत नागपूर शहरातील वेगवेगळया रस्त्यावर व चौरस्त्यावर जवळ—जवळ 18.00 मीटर व त्यापेक्षा जास्त रुंदीच्या रस्त्यावर 22 ठिकाणी पादचारी पुल बांधण्याचे प्रस्ताव आहे. व त्याबाबतचा ठराव वरील प्रमाणे प्रस्तावित आहे.

22 No. ठिकाणी खालील प्रमाणे आहे.

1 कॉटन मार्केट चौक
2 बैद्यनाथ चौक
3 रघुजीनगर चौक
4 सक्करदरा जंन्शन
5 ताजबाग बसस्टॉप
6 दिघारी जंन्शन
7 टाउन हॉल महाल
8 पारडी नाका (नविन / जुना )
9 आंबेडकर गार्डन (सि.ए.रोड)
10 डागा हॉस्पिटल गेट
11 ट्रॉफीक पार्क धरमपेठ
12 राणी दुर्गावती चौक
13 जरीपटका रिंग रोड जंन्शन
14 कोराडी रिंग रोड जंन्शन
15 मानकापुर ( Near New Indoor Statium)
16 जकात नाका (वाडी )
17 वाडी एम.आय.डी.सी. जंशन
18 शिला कॉम्प्लेक्स ( अमरावती रोड)
19 हिंगणा — एम.आय.डी.सी.जंन्शन
20 हिंगणा — रिंग रोड जंन्शन
21 प्रतापनगर चौक
22 नरेंद्रनगर चौक

सदर पादचारी पुलावर म.न.पा.च्या Out door Advt- policy प्रमाणे, उद्योजकाला Advt- right देवून , पादचारी पुलांचे काम (D.B.F.O.T.) Design Built Finance Operate & Transfer म्हणजे खाजगीकरण तत्वावर करण्याचे प्रस्तावित आहे. खाजगीकरण तत्वावर निविदा 22 नं. ( Foot Over Bridge ) बोलविणेचा प्रस्ताव विचारात घेणे, तसेच सदर कामाचे प्रारुप बनविणे, निविदा बनविणे व प्रकल्प संचालन करण्याचे काम म.न.पा. चे पॅनलवर असलेले मेसर्स मोनार्च सर्वेअर ॲण्ड इंजिनिअरींग प्रा.लि.पुणे यांना म.न.पा. च्या प्रचलित दराप्रमाणे देण्याचा प्रस्ताव विचारात घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 270 :— वार्ड क्र. 87, येथील बजाजनगर उद्यान 3 वर्षाकरीता देखभाल करण्यास्तव "समाधान फांऊडेशनला" महानगरपालिकेच्या प्रचलित अटीशर्तीवर देण्यास तसेच समाधान फांउडेशन या उद्यानात वयस्क नागरीकांना सामान्यतः होणाऱ्या व्याधीवर उपयोगी व्यायामाची उपकरणे विनामुल्य उपलब्ध करुन त्यांची देखभाल करणार असल्यामूळे सुरक्षा व्यवस्था म.न.पा. तर्फे करण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 271 :— नागपूर महानगरपालिकेच्या हॉट मिक्स प्लॉन्ट विभागाकरीता नविन व्हील लोडर मशीन खरेदी करण्याच्या कामाकरीता फेरनिविदा (तिसऱ्यांदा) बोलाविल्या असता एकूण दोन निविदा प्राप्त झाल्या. त्या पैकी मे. युनिवर्सल इण्डस्ट्रीयल इक्वीपमेन्ट अण्ड टेक्नीकल सर्विसेस प्रा. लि. यांची निविदा प्राकलनीय दर रु. 35,50,000/— पेक्षा 4.5 टक्के अधिक दराची रु. 37,09,750/— राशीच्या निम्नत्तम दराची निविदेस मंजूरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 272 :— राष्ट्रीय गांधी मार्केट, सक्करदरा संकुलवर 'बांधा, वापरा व हस्तांतरण करा' (B.O.T.) या तत्वावर प्रथम व दुसरा माळा (F.F.+S.F.) बांधण्यास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 273 :— नागपूर शहरातील पथदिव्यांची साहित्याचा पुरवठा करुन देखभाल व दुरुस्ती करण्याकरीता खालिल प्रमाणे सुधारीत निम्नतम निविदा दर मंजूर करण्याचा व खालील नमूद निविदाकारांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या झोनचे काम खालील प्रमाणे तिन वर्षाच्या कालावधीकरीता देण्याचा व देखभाल दुरुस्तीचे हे काम असल्याने कंत्राटदाराने देयक दिल्यानंतर शक्यतो प्राधान्याने या कामाचे भुगतान एक महिन्याचे कालावधीचे आंत करण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

| | | |
|---|---|---|
| १) मनुष्य बळ व वाहने (टुल्स ॲण्ड ने कमी प्लांटस् सह पुरवठा करणे. | - | प्रथम वर्षी प्राकलनीय रकमे पेक्षा २.०% दरावर व तद्नंतर उर्वरीत २ वर्षाकरीता या दरावर |

| | | |
|---|---|---|
| | | १२% प्रति वर्ष वाढ याप्रमाणे (प्रथम वर्षी खर्च रु. ५,४१,६३,६७९/-) |
| २) लॅप, चोक स्टार्टर, इग्नीटर, कॉन्टॅक्टर व टाईमर इ. उपलब्ध करणे | - | प्रथम वर्षी प्राकलनीय दरापेक्षा ०.०% ते ३४.००% ने कमी दरावर व तद्नंतर महाराष्ट्र शानसाच्या सार्वजनीक बांधकाम विभागाच्या विभागीय दर सुचीमधे जे दर प्रत्यक्ष पुरवठयाचे वेळेस लागू असतील त्या दरांवर वर नमूद०.०% ते ३४.०७% ने कमी दरावर - (प्रथम वर्षी खर्चाची मर्यादा रु. 2 कोटी) |
| ३) केबल्स, पोल व इतर सुटे साहित्य बदलविण्याकरीता | - | प्रथम वर्षी प्राकलनीय दरा पेक्षा २% ने कमी व तद्नंतर महाराष्ट्र शानसाच्या सार्वजनीक बांधकाम विभागाच्या विभागीय दर सुचीत प्रत्यक्ष कामाचे वेळेस जे दर लागू असतील त्या दरावर २% ने कमी दरावर - |
| १) झोन क्र. 1 | – | मे. साधना इलेक्ट्रीक वर्क्स, नागपूर |
| २) झोन क्र. 2 | – | मे. निशांत इलेक्ट्रीकल्स, नागपूर |
| ३) झोन क्र. 3 | – | मे. सोनू इलेक्ट्रीकल्स, नागपूर |
| ४) झोन क्र. 4 | – | मे. अनिल इलेक्ट्रीकल्स ॲण्ड असोसिएटस्, नागपूर |
| ५) झोन क्र. 5 | – | मे. व्ही. एस. इंटरप्राइजेस्, नागपूर |
| ६) झोन क्र. 6 | – | मे. लिंक इंटरप्राईजेस्, नागपूर |
| ७) झोन क्र. 7 | – | मे. सोनू इलेक्ट्रीकल्स, नागपूर |
| ८) झोन क्र. 8 | – | मे. राहूल कन्स्ट्रक्शन्स्, नागपूर |
| ९) झोन क्र. 9 | – | मे. दत्त इलेक्ट्रीकल्स, नागपूर |
| १०) झोन क्र. 10 | - | मे. बालाजी असोसिएटस्, नागपूर |

ठराव क्रमांक 274 :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

| | |
|---|---|
| हस्ता /— हरीष दुबे | हस्ता /— दयाशंकर तिवारी |
| निगम सचिव<br>महानगरपालिका,नागपूर | अध्यक्ष<br>स्थायी समिती,<br>महानगरपालिका,नागपूर |